# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:10.09.2025** **वारः बुधवार**

---

१) महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणूकीत विजयी

२) पूरग्रस्त पंजाब आणि हिमाचल प्रदेशसाठी मदतनिधीची घोषणा, पंतप्रधानांनी घेतला आढावा

३) नेपाळमधील भारतीयांसाठी मार्गदर्शक सूचना जारी, नेपाळसाठी विमानसेवा स्थगित

आणि

४) आशिया चषक क्रिकेट स्पर्धेला दुबईत सुरुवात

उपराष्ट्रपती

महाराष्ट्राचे विद्यमान राज्यपाल आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उमेदवार सी.पी. राधाकृष्णन उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणूकीमध्ये विजयी झाले आहेत. या पदासाठी काल झालेल्या निवडणुकीत राधाकृष्णन यांनी आपले प्रतिस्पर्धी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांचा १५२ मतांनी पराभव केला. या निवडणुकीत ७८१ पैकी ७६४ सदस्यांनी मतदान केलं. त्यामध्ये राधाकृष्णन यांना ४५२ तर बी. सुदर्शन रेड्डी यांना ३०० मतं मिळाली. नव्या संसद भवनात झालेल्या या पहिल्याच निवडणुकीत मतदान न करायचा निर्णय बिजू जनता दल आणि भारत राष्ट्र समिती या दोन पक्षांनी घेतला होता. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री अमित शहा, राजनाथ सिंह तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी राधाकृष्णन यांचं अभिनंदन केलं आहे. सी पी राधाकृष्णन यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीत भारतीय जनता पार्टीमध्ये अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. झारखंडच्या राज्यपाल पदाची जबाबदारीही त्यांनी सांभाळली आहे.

पंतप्रधान

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल पूरग्रस्त पंजाब आणि हिमाचल प्रदेशचा दौरा केला आणि या भागाची हवाई पाहणी केली तसंच पूरामुळे बाधित झालेल्या नागरिकांशी संवाद साधला.

पूरग्रस्त पंजाबसाठी सोळाशे कोटी रुपयांची अतिरिक्त मदत जाहीर केली आहे. यापुर्वी जाहीर करण्यात आलेल्या १२ हजार कोटी रुपयांच्या मदतनिधी व्यतिरिक्त ही मदत असणार आहे. हिमाचल प्रदेशसाठी १५ हजार कोटी रुपयांची मदत पंतप्रधानांनी जाहीर केली.

राज्य आपत्ती निवारण निधीचा दुसरा हप्ता आणि पंतप्रधान किसान सन्मान निधी आगाऊ स्वरुपांत जारी केला जाईल. असंही त्यांनी सांगितलं.  तत्पूर्वी, पूरपरिस्थितीचा आढावा घेण्यासाठी पंजाबमधील गुरुदासपूर इथं वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत त्यांनी आढावा बैठक घेतली. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणअंतर्गत पुराच्या पाण्यामुळे नुकसान झालेल्या घरांसाठी पंजाब सरकारनं प्रस्तावित केलेल्या विशेष गृह प्रकल्पाअंतर्गत निधी पुरवला जाईल तसंच समग्र शिक्षा अभियानाअंतर्गत शाळांची उभारणी करण्यात येईल अशी माहिती आकाशवाणीच्या वार्ताहरानं दिली आहे. हिमाचल प्रदेशमधील भुस्खलन, पूर आणि अतिमुसळधार पावसाने झालेल्या नुकासानीचा आढावा पंतप्रधानांनी कांगरा इथं घेतला. या आपत्तीत मृत्यू झालेल्यांच्या निकटवर्तीयांना दोन लाख आणि जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे.

नमो शेतकरी हप्ता

महाराष्ट्र सरकारच्या नमो शेतकरी महासन्मान योजनेच्या सातव्या हप्त्याचं काल मुख्यमंत्री तसंच उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत वितरण करण्यात आलं. या योजनेअंतर्गत केंद्र सरकारच्या सहा हजार रुपये मदतनिधीला राज्य सरकारचे सहा हजार रुपये जोडून देण्यात येतात. तीन टप्प्यात या रक्कमेचं वितरण करण्यात येतं. ९१ लाख ६५ हजार १५६ शेतकऱ्यांच्या खात्यावर एक हजार ८९२ कोटी ६१ लाख रुपये जमा झाल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यक्रमानंतर सांगितलं.

पी एम नेपाळ

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेपाळमधील घडामोडींवर चर्चा करण्यासाठी मंत्रिमंडळ सुरक्षा समितीची बैठक काल घेतली. नेपाळ मधील हिंसा ही हृदय द्रावक आहे. नेपाळमधील तरुणांच्या जिवीतहानीबद्दल त्यांनी दुःख व्यक्त केलं तसंच नेपाळच्या स्थिरता,शांती आणि समृद्धीच महत्व आपल्या समाज मध्यमांवरील संदेशामधून अधोरेखित केलं.

दरम्यान नेपाळमध्ये उद्भवलेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र राज्य आपत्कालीन कार्य केंद्रामार्फत महत्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सध्या नेपाळमध्ये प्रवास टाळावा. जे नागरिक नेपाळमध्ये आहेत त्यांनी आपल्या

निवासस्थानीच सुरक्षित राहावे. स्थानिक प्रशासनाच्या तसेच दूतावासाच्या सूचनांचे पालन करावे. कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी दूतावासाच्या मदत क्रमांकांवर

संपर्क साधावा, अधिकृत माध्यमांद्वारेच दिलेली माहिती ग्राह्य धरावी आणि अफवांपासून दूर राहावं, असे आवाहन या केंद्रामार्फत करण्यात आलं आहे. दरम्यान, एअर इंडिया आणि इंडिगोसहित इतर अनेक विमानकंपन्यांनी नेपाळसाठीची प्रवासी उड्डाने रद्द केली आहेत.

नेपाळ

नेपाळमधील आंदोलन करणाऱ्या युवा प्रतिनिधी नेपाळचे सैन्य अधिकारी यांच्यादरम्यान सैन्य मुख्यालयात जुंगी अड्डा इथं रात्री बैठक झाली. सैन्यदल प्रमुख अशोकराज सिगडेल यांनी आंदोलकांच्या विविध गटाच्या प्रतिनिधीच्या मागण्या समजून घेतल्या.  दरम्यान, देशातील सध्याच्या सुरक्षा आव्हानांना लक्षात

घेऊन नेपाळ लष्कराने विशेष सुरक्षा प्रक्रिया सुरू केल्या आहेत. लूटमार, जाळपोळ आणि अराजक कारवाया नियंत्रित करण्यासाठी सामान्य नागरिकांनी  सक्रियपणे सहकार्य करण्याचे आवाहन सैन्यदलाने केलं आहे. काठमांडू इथं राष्ट्रीय वाणिज्य बँक लुटण्याचा प्रयत्न करणाऱ्या पाच जणांना अटक करण्यात आल्याची माहिती सैन्यदलाच्या प्रतिनिधींनी दिली.

भारत-अमेरिका

भारत आणि अमेरिका व्यापारासंदर्भातील अडथळे दूर करण्यासाठी वाटाघाटी सुरू ठेवतील अशी आशा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ सोशल या समाजमाध्यमावरील संदेशात व्यक्त केली आहे. आपले मित्र असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा करण्यास उत्सुक असल्याचंही ते म्हणाले. दोन्ही देशांसाठी सकारात्मक असलेल्या निष्कर्षापर्यंत पोहोचण्यात कोणतीही अडचण येणार नाही अशी आशा त्यांनी व्यक्त केली. अमेरिकेने भारतीय वस्तूंवर ५० टक्के आयातशुल्क लादल्याच्या पार्श्वभूमीवर दोनही देशांदरम्यान व्यापारसंदर्भात तणावाचं वातावरण निर्माण झालं आहे. या आठवड्याच्या सुरुवातीला, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी भारत-अमेरिका संबंधांना विशेष महत्व असल्याचं म्हटलं होतं, तर पंतप्रधान मोदींनी "व्यापक आणि जागतिक धोरणात्मक भागीदारी" साठी दोनही देश महत्वाचे असल्याचे नमूद केलं आहे.

दोहा-इस्राइल

इस्राईली सैन्यानं कतारची राजधानी दोहा इथं काल अनेक ठिकाणी स्फोट घडवले.  आणि या हल्ल्यात प्रमुख हमास नेत्यांना लक्ष केलं अशी माहिती इस्त्रायलनं दिली.  इस्राईलच्या संरक्षण दलानं आणि इस्राईली अंतरीक सुरक्षा संस्था शिन बेट नं या हल्याची जबाबदारी घेतली आहे. त्यामुळे कतारच्या भूमीवर इस्राईलची ही पहिली लष्करी कारवाई ठरली आहे.

भारत कतार

भारतानं दोहामधील इस्राईली आक्रमणानंतर चिंता व्यक्त केली आहे. भारताच्या शांतता आणि सुरक्षिततेसाठी संयम आणि कूटनीती नं काम करण्याचं आवाहन भारतानं केलं आहे.  परराष्ट्र मंत्रालयानं दिलेल्या एका विधनात या घडामोडिंविषयी आणि त्यांच्या सुरक्षा क्षेत्रातील परिणामांविषयी चिंता व्यक्त केली आहे.

जीएसटी

जीएसटी सुधारणांमध्ये हातमाग उत्पादनांवरील १२ टक्क्यांवरुन ५ टक्क्यांवर आणला आहे. यामुळे भारताची सांस्कृतिक अर्थव्यवस्था मजबूत करणे, ग्रामीण उपजीविकेला पाठिंबा देणे आणि पारंपरिक हस्तकलेला प्रोत्साहन मिळेल अशी केंद्र सरकारला आशा आहे. हस्तनिर्मित, घरगुती कला टिकवणं आणि व्यावसायिक वृध्दी करण्याचा हा एक प्रयत्न आहे. असं चेंबर ऑफ कॉमर्सचे आर्थिक सल्लागार प्रवीण साहू यांनी या जीएसटी सुधारणांचे कौतुक करताना सांगितलं. ते काल पत्रकारांशी बोलत होते.

मदत

पूरग्रस्त जम्मू काश्मीरला महाराष्ट्राकडून मदतीचा हात म्हणून तिथल्या मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी राज्य सरकारनं पाच कोटी रुपये दिले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत पत्रकारांना  दिली. प्रदेश भाजपानंही मदतीचा हात पुढे केला असून भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी जम्मू काश्मीरच्या भाजपा अध्यक्षांशी चर्चा करून तिथे लागणारी आवश्यक मदत सामग्री काल जम्मू काश्मीरला रवाना केली आहे. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत काल ही सर्व मदत  जम्मू काश्मीरला रवाना करण्यात आली. यापुढील काळात राज्याच्या विविध भागातून आणखी मदत सामग्री पाठवण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

उत्तराखंड गंगोत्री धाम

उत्तराखंड मध्ये झालेल्या मुसळधार पावसानं उत्तरकाशी मध्ये हाहाकार माजवला आहे. या पार्श्वभूमीवर गंगोत्री धाम यात्रा बंद करण्यात आली होती, प्रशासनाच्या 35 दिवसांच्या अथक प्रयत्नांनंतर गंगोत्री धाम यात्रेला अधिकृतपणे काल पुन्हा सुरुवात झाली. प्रशासन आणि सीमा रस्ता सुरक्षा संघटनांच्या मदतीन गंगोत्री राष्ट्रीय महामार्गावरील नुकसान ग्रस्त भागांची दुरुस्ती करून यात्रा पुन्हा एकदा सुरू करण्यात आली आहे. काल संध्याकाळी 100 पेक्षा अधिक भाविकांनी गंगा मातेचं दर्शन घेतलं.

हवामान

भारताच्या पूर्व आणि द्वीप कल्पीय भागात पुढील 4 ते 5 दिवस मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाच्या वतीनं वर्तवण्यात आला आहे. तर  पश्चिम बंगालच्या काही भागात आणि सिक्कीम मध्ये आज मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. मध्य प्रदेशातील पूर्व भागाबरोबरच, छत्तीसगढ, बिहार आणि ऑडिशमध्ये तसंच तामिळनाडू,केरळ,कर्नाटक आंध्र प्रदेशचा सागरी भाग आणि तेलंगणा मध्ये पुढील 3 ते 4 दिवस जोरदार पावसाची शक्यता आहे.

क्रिकेट

आशिया चषक क्रिकेट स्पर्धा कालपासून संयुक्त अरब अमिरातीत सुरू झाली. यात भारताचा पहिला सामना आज दुबईत संयुक्त अरब अमिरात अर्थात यूएईच्या संघाशी तर येत्या १४ तारखेला पाकिस्तानबरोबर होणार आहे. अबूधाबी इथं काल अफगाणिस्तान आणि हाँगकाँग यांच्यात झालेल्या पहिल्या सामन्यात अफगाणिस्ताननं हाँगकाँग वर ९४ धावांनी विजय मिळवला.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.